# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 14 December 2024

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १४ डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.

****

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बहुविद्याशाखीय शिक्षणाला चालना देण्यात येत आहे. उच्च शिक्षण क्षेत्रातल्या विविध संधी विद्यार्थ्यांना मिळाव्यात यासाठी मुंबई विद्यापीठात आता दुहेरी पदवी शिक्षणाला विद्या परिषदेनं मंजुरी दिली आहे. यानुसार, आता विद्यार्थ्यांना विविध विद्याशाखेतील आणि ज्ञानक्षेत्रातल्या ज्ञानार्जनाच्या संधी उपलब्ध होतील. दुहेरी पदवीच्या शिक्षणाअंतर्गत आता विद्यार्थ्याला दोन महाविद्यालये किंवा दोन उच्च शिक्षण संस्थामध्ये एकत्र प्रवेश घेता येणार असून त्यांना शिक्षणक्रम पूर्ण केल्यावर दोन पदव्या मिळणार आहेत. दुहेरी पदवीच्या शिक्षणक्रमाअंतर्गत दोन्ही पदव्या दुरस्थ शिक्षण पद्धतीनं किंवा एक प्रत्यक्ष आणि दुसरी दुरस्थ शिक्षण पद्धतीनं मिळवता येणार आहे. याव्यतिरिक्त, या तरतुदीअंतर्गत दोन्ही पदव्या प्रत्यक्ष शिक्षण पद्धतीद्वारे एकाच वेळी विद्यार्थ्यांना मिळवता येणार आहे. पण यासाठी सहभागी महाविद्यालयांनी विद्यापीठाची रितसर मंजुरी घेऊन शैक्षणिक सामंजस्य करार करणं गरजेचं राहणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

चित्रपट अभिनेता अल्लू अर्जून याची आज हैद्राबादमधील चंचलगुडा इथल्या कारागृहातून सुटका झाली. त्याला त्याचा सिनेमा पुष्पा २ च्या प्रिमियरदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत एका महिलेच्या मृत्यूप्रकरणी अटक करण्यात आली होती. दरम्यान, सूचना आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी राज्य आणि स्थानिक प्रशासनाच्या गैरकारभारामुळे ही घटना घडल्याचं सांगितलं आहे. तेलंगणा सरकारनं सिने कलाकारांवर कारवाई करण्याऐवजी दुर्घटना प्रभावित लोकांना मदत करुन दोषींवर कारवाई करावी, असंही त्यांनी म्हटलं आहे.

****

दत्तजयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगरसह राज्यात आज ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. काकड आरती आणि मंगलआरती, अभिषेक, महापूजा, नैवेद्य, महाआरती, महाप्रसाद तसंच कीर्तनाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला आहे. दरम्यान सांगली जिल्ह्यात पलूस तालुक्यातील औदुंबर इथं कालपासून विविध कार्यक्रम होत आहेत.

****

बीडच्या जिल्हाधिकारीपदाचा अतिरिक्त पदभार जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांच्याकडे सोपविण्यात येणार आहे. बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक एक महिना प्रशिक्षणासाठी गेले आहेत. या काळात बीडचा अतिरिक्त पदभार जालन्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे सोपवण्यात आला पण पांचाळ हेही १६ ते १८ डिसेंबरदरम्यान प्रशिक्षणासाठी केरळला जात आहेत.

****

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर फेरमतमोजणी व्हावी, यासह आगामी सर्व निवडणुका बॅलेट पेपरवर घ्याव्यात, या मागणीसाठी महानुभाव पंथ आणि वारकरी परिषदेच्या वतीनं काल नाशिकच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात प्रमुख विरोधी पक्षासह पराभूत झालेल्या सर्वच उमेदवारांनी सहभाग घेतला. दरम्यान, यावेळी ‘इव्हीएम’ची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढण्यात आली. लोकशाही वाचविण्यासाठी मतदान यंत्र हटवून कागदी मतपत्रिकेवर निवडणूक घ्यावी, अशा मागणीचे निवेदन यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. या मोर्चात मनसेचे पराभूत उमेदवार दिनकर पाटील, प्रसाद सानप, माकपचे जे. पी. गावित, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अनिल कदम आदी सहभागी झाले होते.

****

राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत हिंगोली जिल्ह्यातल्या जिल्हा सामान्य रुग्णालयात नुकतंच आरोग्य शिबीर घेण्यात आलं. यामध्ये नवजात बालकांपासून १८ वर्ष वयोगटातील १३० संदर्भित हृदयरुग्णांची टुडी इको तपासणी करण्यात आली. यापैकी २० विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करणं आवश्यक असून महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना आणि आरबीएसके कार्यक्रमाअंतर्गत या शस्त्रक्रिया मोफत होणार आहेत.

****

राज्यात पुन्हा थंडीचा कडाका जाणवत असून विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत घट झाली आहे. काल सर्वात कमी किमान तापमान आठ पूर्णांक नऊ दशांश सेल्सिअस जळगांव इथं नोंदवलं गेलं. आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

****

भारत आणि ऑस्ट्रेलिया संघांदरम्यान, बॉर्डर गावस्कर करंडक क्रिकेट कसोटी मालिकेत ब्रिस्बेन इथं आज सुरु झालेल्या तिसऱ्या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. पावसाच्या व्यत्ययानंतर आतापर्यंत ऑस्ट्रेलियाच्या २८ धावा झाल्या आहेत. दोन्ही संघांनी पाच सामन्यांच्या या मालिकेतला एकेक सामना जिंकला आहे.२०२१ मध्ये याच मैदानावर ऑस्ट्रेलियावर तीन गडी राखून मिळवलेल्या विजयाची भारत पुनरावृत्ती करण्याच्या प्रयत्नात आहे.

****

हाँगकाँग इथं सुरू असलेल्या जागतिक स्क्वॉश सांघिक स्पर्धेत पाचव्या स्थानासाठी भारतीय पुरुष संघ आज यजमान हाँगकाँगशी भिडणार आहे.

****